ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महाविद्यालयीन विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व

**संशोधक**
**प्रा. विजय शामराव कांडलकर**
राज्यशास्त्र विभाग, संताजी महाविद्यालय, नागपूर

**मार्गदर्शक**
**डॉ. एन. आर. चिमुरकर**
राज्यशास्त्र विभाग, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

★★★

**सारांश :–** महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता सामाजिक बांधीलकी इ. गुणांची निर्मिती करून एक सक्षम स्वंयसेवक तयार करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे. राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर या दोन उपक्रमाद्वारे समाज प्रबोधन करण्याचे कार्य करीत असते. महाविद्यालयीन युवकामध्ये ज्ञानप्राप्ती बरोबरच श्रम, सेवा, चारित्र, आणि त्याग या गुणाद्वारे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधने, शिक्षणाबरोबरच जगण्याचा व व्यवहाराचा अनुभव देणे, माझे ज्ञान, असे क्रम, माझी शक्ती केवळ माझ्यापुरतीच मर्यादीत नसुन ती सर्व समाजाकरीता आहे. याची जाणीव करून देणे या उदात्त हेतूने राष्ट्रीय सेवा योजना प्रभावीत झालेली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाअंतर्गत नीयीमत होणारे कार्यक्रम व शिबीराच्या माध्यमातून विद्यार्थ्यानच्या अंगी कृतिशीलता विकसीत होण्यास निश्चीतच साहयभुत झालेले आहे.

**बिजशब्द :–** विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना, शैक्षणिक कार्यक्रम, व्यक्तिमत्व विकास, राष्ट्रीय छात्र सेना, श्रम संस्कार शिबीर, युवा कल्याण, उपक्रम, लोकशाही, सामाजिक बांधिलकी.

**प्रस्तावना :–** विद्यार्थी जिवनात महाविद्यालयीन टप्पा हा विशेष महत्त्वाचा मानला जातो. या स्तरावर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या ज्ञानात दिवसागणीक भर तर पडतच असते. मात्र त्यासोबतच त्या ज्ञानाला गतीमानताही प्राप्त होत असते. ज्ञानाच्या कक्षा रूंदावत असतांनाच त्याला योग्य व निश्चित दिशा मिळुन त्या ज्ञानाचा सदुपयोग कसा होईल ही सुध्दा बाब या स्तरावर लक्षात घेणे तीतकेच महत्त्वाचे आहे. शैक्षणीक सत्रातील अभ्यासविषयक कार्यक्रमात विशेष हजेरी असतांनाच अभ्यासपुरक विविध कार्यक्रमातही विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग असते हे या स्तरातील महत्त्वपुर्ण बाब आहे. कारण या अभ्यासपुरक कार्यक्रमाच्या माध्यमातुनच विद्यार्थी जीवनाला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळत असते. या उपक्रमाद्वारे मिळणाऱ्या संधीतुनच विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा कक्षा रूंदावतानाच त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन ती जबाबदारी पेलण्याची क्षमताही विकसीत होत असते.

**संशोधन पद्धती :–** प्रस्तूत षोध निबंधामध्ये वर्णनात्मक, विष्लेशणात्मक व तुलनात्मक पदधतीचा अवंलब करण्यात आलेला आहे. महाविद्यालयीन षैक्षणीक सत्रात जे विविध कार्यक्रम चालतात त्यात राश्ट्रीय सेवा योजना या उपक्रमाला महत्त्वाचे स्थान आहे. अधिकाराच्या प्राप्तीबरोबरच कर्तव्याचे निर्वाहणसुध्दा तेवढेच महत्त्वाचे आहे. हे या योजनेच्या माध्यमातुन बींबवण्याचे महान कार्य होत असते. स्वतःचे हित साध्य करतांना समाजाच्या हिताचाही विचार महत्त्वाचा आहे. आपण ज्या समाजामध्ये राहतो त्या समाजाचे आपल्याला काही देणे आहे. ही भावना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात वाढीस लागणेही गरजेचे आहे. यात विषेश म्हणजेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास घडवुन आणणे हा महान उद्देष डोळयासमोर ठेऊनच राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. या योजनेचा लाभ घेत विद्ययार्थ्यांनी आपला सर्वांगीन विकास साध्य करून एक आदर्ष नागरीक म्हणून घडविण्यास समाजाला साहय करणे अपेक्षीत आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना :–** महाविद्यालयात विद्यार्थी षिकत असतांना व उच्च षिक्षण घेत असतांना विद्यार्थी व युवकांचा राश्ट्राच्या उभारणीमध्ये योगदान असावे व त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमतेचा ठराविक दिषेने विकास करण्याच्या अनुशंगाने एक योजना तयार करण्यासाठी केंद्रिय स्तरावर प्रयत्न चालले. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरू यांच्या सुचनेनुसार डॉ. सी. डी. देषमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. नेमण्यात आलेल्या या समितीने अनेक देषातील युवकांषी सबंधीत धोरणाचा अभ्यास करून राश्ट्रीय सेवा योजनेची सुचना केली होती.

केंद्र सरकारच्या सुचनेनंतर कोठारी षिक्षण आयोगानेही 1964 ते 1965 मध्ये याचप्रकारे षिफारस करूण स्वंयसेवी स्वरूपामध्ये कार्यक्रम देतांना समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयन स्तरावरती सुरू करण्याची सुचना केली होती. यांनतर 1967 मध्ये पार पडलेल्या विविध विद्यापीठातील कुलगुरूच्या परिषदेमध्येही समाजसेवा ही शिक्षणाचा भाग असेल अशी शिफारस पुढे आली. त्यानुसार निवडक महाविद्यालये व इतर संस्थामध्ये प्रायोगीक तत्वावर राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम सूरू करण्यात आला. यानुसार 24 संप्टेबर 1969 रोजी देषात 'राष्ट्रीय सेवा' योजना सुरू करण्यात आली. केंद्रशासन व राज्यसरकारे यांच्या सहकार्याने ही योजना राबविण्यात येत असते. हया योजनेकरीता महाविद्यालयाची निवड करण्याचे काही निकष आहेत. ज्या संस्थेत समाजकार्य करण्याची प्रथा आहे. तसेच ज्या संस्था ग्रामीण विभागातील विकासकार्य करण्याच्या दृष्टिने ग्रामीण विभागाजवळ आहेत. अषी महाविद्यालये राष्ट्रीय सेवा योजनेसाठी निवडली जातात.

राष्ट्रीय सेवा योजना ही सक्तीच्या राष्ट्रीय छात्रसेना योजनेचा पर्याय म्हणुन सुरू झाली. राष्ट्रीय छात्रसेना दलात न जाणाऱ्या विद्यार्थ्यांने राष्ट्रीय सेवा योजनेत भाग घ्यावा अशी अपेक्षा होती. या योजनेतील आर्थिक जबाबदारी लक्षात घेऊन प्रत्येक राज्यातील काही निवडक महाविद्यालयापुरतीच ही योजना लागु करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांच्यात सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी हा या योजनेमागील उद्देश असतांनाच महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे, ग्रामीण विभागातील रस्ते बांधणे, प्रौढ शिक्षण, गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार नागरी संरक्षण इ. कार्यक्रमांचा या योजनेत समावेश आहे. 1976—77 पासून ग्रामीण विभागाची सुधारणा तसेच आर्थिक व सामाजिकदृष्टया कमजोर असलेल्या लोकांच्या विकासाची कामे यावर भर देण्यात आला.

म. गांधीचा खेडयाकडे चला हा विचार घेऊन गावांमध्ये विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीरामार्फत ग्रामस्वच्छता, सर्वांगीण व शास्वत विकास, रस्त्यांची कामे, बंधारा बांधणे, वृक्षारोपन, रक्तदान, आदी कार्य श्रमदान, पथनाटय, रॅली, परिसंवाद, गावकऱ्याशी चर्चा व सवांद या माध्यमातुन समाजाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक व शैक्षणीक क्षेत्रात युवाशक्ती व ऊर्जास्त्रोत पुरविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन चालत असते. स्वंयशिस्त समाजसेवा, लोकशाही, मुल्यशिक्षण हे सर्व स्वंयसेवकामध्ये रूजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात जाणीव जागृती घडविणे व सकारात्मक विचाराची पेरणी करतांनाच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभीनव उपक्रम आहे.

**महाविद्यालयीन विद्यार्थी व रा�ट्रीय सेवा योजना** स्वावलंबन, चारित्र्य संर्वधन, सामाजिक बांधीलकी या मुल्यांचा समन्वय नविन षिक्षण पध्दतीत घडवुन आणण्यासाठी 1969 या म. गांधीच्या जन्मषताब्दी वर्शापासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना ही भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालयातर्गत राबविली जाते. आजच्या गतीमान समाजात तारूण्याच्या उंबरठयावर असलेला महाविद्यालयीन विद्यार्थी कुठेतरी भरकटत जाऊ नये म्हणुन राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातुन समाज परिवर्तन करण्याचे कार्य आज राष्ट्रीय सेवा योजनेचा तरूण करीत आहे. महाविद्यालयीन षिक्षण घेत असतांनाच समाज सेवा करणे, आपल्या जवळपासच्या परिसरामध्ये व त्या परिसरातील लोकांमध्ये मिसळुन त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे, समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे या उदात्त हेतुने ही राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली आहे.

समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागष्ती करणारा तसेच राश्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे. या उपक्रमामध्ये साक्षरता संबधी कार्य, पर्यावरण सुरक्षा, आरोग्य व स्वच्छता, आपातकालीन परिस्थितीतील कार्य, गरजु तसेच पीडीत लोकांना सहकार्य इ. समाज उपयोगी अथवा समाजाच्या हितासाठी अनिवार्य असे कार्य करण्याची प्रेरणा ही या उपक्रमातुन मिळत असते. त्यामुळे समाजसेवा करीत असतांनाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत राश्ट्रसेवाच्या गुणांचा विकास होतो. या उपक्रमासोबतच गावाची उभारणी करणे, लोकांमध्ये आत्मविष्वास जागष्त करणे षारिरिक मदत करणे यासारखे उपक्रम राश्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन हाती घेतले जातात.

राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य हे 'माझ्यासाठी नव्हे तर तूमच्यासाठी' **(Not Me But You)** असे आहे. ते आपणाला लोकषाही सामाजिक बांधीलकीची जाणीव करून देते. त्या सोबतच निःस्वार्थ सेवेची गरज दाखवून देते. या बोधवाक्यात दुसऱ्या व्यक्तिचा दष्टीकोन विचारात घेतला पाहिजे हे यावरून सूचित होते. परोपकाराची भावना ठेऊन निस्वार्थ सेवा करण्याचा मार्ग दाखविणे, दुसऱ्यांच्याही विचारांचा आदर राखणे व समाजावून घेणे, त्यांना प्रत्येक कार्यात आवष्यक ते सहकार्य करणे, दुसऱ्या बद्दल सहानुभुती दर्षविणे इ. बांबीचे प्रतिनिधीत्व हे राश्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य करते. व्यक्तिचा विकास झाला तरच समाजाचा विकास होईल. सामाजिक भान ठेऊन आपण नेहमी समाजाच्या उपयोगी पडावे. समाजाचे अनुकरण आपल्या दैंनदीन व्यवहारात करून समाजोपयोगी विकास घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे हे बोधवाक्य प्रेरीत करते.

महाविद्यालयात अभ्यासविषयक माहितीची उपलब्धता करून देत असतांनाच युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्याचे काम या स्तरावर होत असते. तर हे प्रभावी व्यकिमत्व घडवित असतांना तरूणामध्ये सामाजिक बांधीलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे काम महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना युवा चळवळीतुन होत असते. या कारणामुळेच उच्च शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमाची व्याप्ती वाढत आहे. तसेच या चळवळीला युवा पीढीचा सकारात्मक प्रतिसादही लाभत आहे. म्हणूनच राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विश्वातील मोठी विधायक युवा चळवळ म्हणून समोर येतांना दिसत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची ही युवा चळवळ अखंड सुरू राहावी याकरिता केंद्र व राज्यसरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार या युवा चळवळीच्या माध्यमातुन करीत आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्टयेः**—विद्यार्थी महाविद्यालयात शिकत असतांना व अभ्यासाचे धडे घेत असतांनाच शैक्षणिक परिसर व जवळपासच्या परिसरातील समुदायामध्ये मिसळुन त्याचबरोबर त्यांना समजुन घेवून रचनात्मक कार्य करणे समाजसेवेच्या माध्यमातुन मिळलेल्या संधीद्वारे स्वतःचा विकास करणे या उद्देशाने ही योजना सुरू झाली. या योजनेची प्रमुख उद्दीष्टे पूढीलप्रमाणे आहेत.

1) सामाजिक ऋणाची जाणीव ठेऊन समाजातील समस्या निट समजून त्या समाजाशी समरुप होणे.
2) विधायक आणि सर्जनशील प्रतिभेद्वारा विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकीची भावणा निर्माण करणे.

3) समाजाच्या अडचणी लक्षात घेवून समाजाच्या गरजांची माहिती करुन त्यांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न चालविणे.

4) आपल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग हा समाजाच्या हितासाठी करणे.

5) समाजात मिसळयासाठी व त्यांच्यांशी एकरूप होण्याकरिता आवश्यक गुणांचा विकास करणे.

6) समाजातील अज्ञान दुर करण्यासाठी साक्षर व निरक्षर यांच्यातील भेद नाहीसा करणे व सर्वांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

7) लोकशाहीला पोशक अशा वातावरणाच्या निर्मितीसाठी नेहमी प्रयत्नशिल राहणे व त्यासाठी नेतृत्व गुणांचा विकास करणे.

8) सामाजिक समस्याचे निवारण करण्यासाठी आपल्या अंगभुत कौशल्याचा अवलंब करणे.

9) आपत्ती व्यवस्थापनाचा एक घटक म्हणून मानवनिर्मित व नैसर्गिक संकटाचा सामना करण्यास सदैव तत्पर असणे.

10) राष्ट्रीय एकता व अखंडतेसाठी निरतंर प्रयास करणे व विकास करणे.

**राश्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व :–** चार भिंतीच्या आत मिळणाऱ्या पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांची बौध्दीक, मानसीक व वैचारीक जडण – घडण तर होतेच मात्र यासोबतच कृतिशील वा व्यावहारीक अनुभवही तीतकाच गरजेचा आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमातंर्गत नियमित होणाऱ्या कार्यक्रम व शिबीराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी ही कृतीशिलता विकसीत होण्यास निश्चितच साहयभूत ठरते. विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासाच्या दृष्टिने उपयुक्त अशा राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व पुढिलप्रमाणे विषद करता येईल.

1) राष्ट्रीय सेवा योजनेतील उपक्रमातंर्गत व होणाऱ्या विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून मानवी अधिकार व लोकाधिकाराची माहिती समाजातील तळागाळापर्यंत पोहचत असते.

2) या उपक्रमातर्गत होणाऱ्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असते.

3) समाजाच्या प्रत्यक्ष स्थितीची जाण होत असल्यामुळे विद्यार्थी हा स्वप्नाळु विश्वातून बाहेर पडुन वास्तवाला सामोरे जाण्यास तयार होत असतो.

4) विद्यार्थी वा स्वंयसेवकाला या उपक्रमातुन विविध सामाजिक समस्यांची जाणीव होते व त्याचे निराकरण करण्याचे कौशल्य प्राप्त होत असते.

5) या उपक्रमात विविध सामाजिक संस्थाचा सहभाग करून घेण्यात येत असल्यामुळे विद्यार्थी हा अशा संस्थाशी जवळुन परिचीत होत असते.

6) राष्ट्रीय सेवा योजनेत व त्यातील होणाऱ्या कार्यक्रमात नावीण्यपुर्ण उपक्रम राबविले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वंयरोजगाराची दिशा मिळत असते.

7) या उपक्रमातून समाजप्रबोधन, लोकजागृती करण्याच्या अनुशंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे मंनोरंजनासोबतच परीवर्तन होण्यासाठी चालना मिळते.

8) रस्त्यांची कामे, बंधारे बांधणे, ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण जल संर्वधन इ. रचनात्मक कार्यक्रम विद्यार्थी वा स्वंयसेवक या माध्यमातुन करून समाजाच्या विकासास हातभार लावतात.

9) विद्यार्थी वा स्वंयसेवक होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन श्रमविषयक कार्यात योगदान देत असल्यामुळे त्यांच्यात श्रमाचे महत्त्व कळते.

10) आजच्या गतीमान जीवनात निर्माण होणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडविण्यात स्वंयसेवकाचा वा विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणावर हातभार लागतो.

11) ग्रामीण भागात होणाऱ्या श्रम संस्कार शिवीराच्या माध्यमातून व त्यातील कार्यक्रमातंर्गत ग्रामवासीयांना विविध योजनांची माहिती मीळत असते व त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा याविषयकही मार्गदर्शन मिळत असते.

12) राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमात सहभागी होणाऱ्या स्वंयसेवकाला वा विद्यार्थ्यांस सहभागी झाल्यामुळे त्यांना अतिरिक्त गुण व प्रमाणपत्रही मिळत असते. ज्यामूळे त्यांच्या शालेय प्रगतीस हातभार लागत असते.

**निष्कर्श :–** महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच विद्यार्थ्याने सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन समाजसेवा करणे, आपल्या परिसरातील लोकांमध्ये समरस होऊन त्यांच्याशी संवाद साधुन किंबहुना त्यांना समजावून घेऊन विधायक व रचनात्मक कार्य करणे आणि समाजसेवेच्या माध्यमातुन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे या उदात्त हेतूने सुरू झालेली राष्ट्रीय सेवा योजनेचे अणण्य साधारण महत्व आहे. या विशयक तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांनी केलेले कथन लक्षवेधक ठरते ते म्हणतात. ''राष्ट्रीय सेवा योजनेमुळे महाविद्यालयीन, विद्यापीठीय युवकांना राष्ट्रीय छात्र सेनेप्रमाणे समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची नवी संधी मिळत आहे.'' त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना हा केवळ अभ्यासपुरक वा अभ्यासेत्तर उपक्रम नाही तर तो एक लोक जीवनाचा सक्रिय अभ्यास करण्याचा कार्यक्रम आहे. हे खरे.

***संदर्भ ग्रंथ सुची :–***

*1 प्रा. घाटोळे रा. ना., 1983, भारतीय समाज व्यवस्था, श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर.*

*2 प्रा. भांडारकर पु. ल., 1976, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.*

*3 डॉ. वेलुकर राजन, 1999, आम्ही यशस्वी होणार, रा. से. यो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्रराज्य.*

*4 प्रा. देशमुख दिवाकर, 1983, श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाषन, नागपूर.*